कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पं दे कृ वि., वणी रंभापूर.

जा. क्रं. / मप्राप्र /ता/ ६९० /२०२३ दिनांक: ०४/०७/ 2023

## निविदा सूचना

प्रती

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

विषय: सन २०२३ - २४ करीता विविध विभागावर बिजोत्पादन क्षेत्रामधील दैनंदिन कामे कंत्राटी पध्दतीने करण्याच्या कामास कंत्राटी मजुर पुरविण्या बाबात...

संदर्भ : जा.क्र. वि.प्र/कृषिविद्या/शेती काम दर/291/2023 दि. 31/5/2023.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, म.प्रा.प्र. वणी रंभापुर येथे सन २०२३ - २४ करीता खरीप व रब्बी हंगामा मधील बिजोत्पादन क्षेत्रामध्ये करण्यात येणा-या दैनंदिन कामाकरीता खालील तक्त्यात नमुद केलेल्या कामाप्रमाणे बाहेरील कंत्राटी दाराकडुन खालील दिलेल्या पत्त्यावर दिनांक १३/७/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत मोहरबंद लिफाफयात निविदा मागविण्यात येत आहे.

### शेती व इतर कामे करण्यासाठी प्रति हेक्टर/प्रति दिन/प्रति नग करीता

| अ.क्र. | करावयाचे काम | तपशिल | कंत्राटीदाराचे दर रूपये |
|---|---|---|---|
| १. | नांगरणे (प्रति हेक्टर) | ट्रॅक्टरने | |
| | | ट्रॅक्टरने (दोन फाळी) | |
| | | ट्रॅक्टरने (तिन फाळी) | |
| २. | मोगडणे (प्रति हेक्टर) | फंटावाही/पंजी | |
| ३. | वखरणे (प्रति हेक्टर) | ट्रॅक्टरने | |
| | | बैलाने (वखर, मजुरासहीत) | |
| | | रोटावेटर | |
| | | पट्टी पास/जांभुळ वाही | |
| ४. | काशा/धसकटे/कचरा वेचणे | (प्रति हेक्टर) | |
| ५. | शेणखत भरणे/उतरविणे/वाहतुक ५ टन | वाहन व मजुरासह (५ किमी अंतर जाणे – येणे) | |
| ६. | शेणखत पसरविणे | (प्रति हेक्टर) | |
| ७. | टोकण पध्दतीने पेरणी (प्रति हेक्टर) | जास्त अंतर (९० ते १२० सेमी) | |
| | | कमी अंतर (३० ते ६० सेमी) | |
| ८. | तणनाशकाची फवारणी (प्रति हेक्टर) | नॅपर्सॅक स्प्रे मजुरासहीत (तणनाशक सोडुन) | |
| | | ट्रॅक्टरने बुम स्प्रे | |
| ९. | विरळणी (प्रति हेक्टर) | जास्त अंतरावरील पिक (९० ते १२० सेमी) | |
| | | कमी अंतरावरील पिक (९० ते १२० सेमी) | |
| १०. | कोळपणी/डवरणी (प्रति हेक्टर) | बैल जोडी मजुरासह | |
| | | ट्रॅक्टरने | |
| ११. | खुरपणी/निंदण (प्रति हेक्टर) | खरीप | |
| | | रब्बी | |
| अ.क्र. | करावयाचे काम | तपशिल | |
| १२. | वरखत देणे (प्रति हेक्टर) | सरत्याव्दारे | |
| | | बांगडी पध्दतीने | |
| | | हाताने फेकणे | |
| १३. | पिकाला पाणी देणे/रान भिझविणे (प्रति | मोकाट पध्दत | |
| | | स्प्रिंकलर पध्दत | |
| १४. | फवारणी (प्रति हेक्टर) | साधा स्प्रे | |
| | | पावर स्प्रे | |
| | | पावर स्प्रे (प्रति तास पेट्रोलसह) | |
| | | ट्रॅक्टरने बुम स्प्रे पंपाव्दारे | |
| १५. | पिक काढणी/कापणी (प्रति हेक्टर) | मुंग शेंगा तोडणे, शेंगा बडविणे व उधळणे | |
| | | सोयाबिन/उडीद कापणी व खळयावर जमा करणे | |
| | | ज्वारी/बाजरी/मका कापणी व बांधणी, कणस खुंडणे, खळयावर | |
| | | गहु कापणे व बांधणे, खळयावर जमा करणे | |
| | | तुर कापणी व बांधणी, जमा करणे, बडवणे व उपणने आणि | |
| | | भुईमुंग काढणी, शेंगा तोंडणी व पिक जमा करणे | |
| | | सुर्यफुल, जवस, तिळ, कराळ, ओवा, काढणे व गोळा करणे | |
| | | करडई कापणे, बांधणे, गोळा करणे | |
| | | हरभरा कापणे, बांधणे, गोळा करणे | |
| | | मळणी (थ्रेशर) प्रति क्विंटल मजुरासह | |
| | | यंत्राणे पिक काढणे कंम्बाइन हार्वेस्टर | |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | बैल चारणे/राखणे | १० जनावरांपर्यंत | |
| १७. | वळई रचणे | १००० पेंडयासाठी | |
| १८. | कापूस वेचणे | प्रति किलो | |
| | | बोजा भरणे (२ क्विंटल) प्रति नग | |
| १९. | चाळणी, वजन | चाळणी करून वजन करणे (प्रति क्विंटल) | |
| २०. | चाळणी, वनज करणे लोंडीग व अनलोडींग | लोंडीग व अनलोडींग (प्रति क्विंटल) | |
| २१. | ऊस/हळद (प्रति हेक्टर) | स–या पाडणे | |
| | स–या तोडणे/धोळणे/ऊस | | |
| २२. | पोत्याची थप्पी लावणे (प्रति क्विंटल) | | |
| २३. | दांड तयार करणे | | |
| २४. | उपटतण करणे (अडाण काढणे) | प्रति हेक्टर | |
| २५. | बिजोत्पादन मधील भेसळ काढणे | प्रति हेक्टर | |
| २६. | ऊस (प्रति हेक्टर) | बाळ बांधणे | |
| | | कापणी, बांधणी, गंजी लावणे (प्रति टन) | |
| २७. | प्रक्षेत्रावरील पिक राखणे | १० हेक्टर ८ तासा करीता | |
| २८. | कपाशी जिनिंग करणे | प्रति क्विंटल | |
| २९. | कपाशी स्वच्छ करणे | प्रति क्विंटल | |
| ३०. | बिज प्रक्रिया केंद्रातील कामे | प्रक्रिया पॅकिंग,टॅगिंग, बिज प्रक्रिया इ. (प्रति क्विंटल) | |

सोबत जोडलेल्या प्र-पत्रात तपशील प्रमाणे दिनांक १३/०७/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लीफाफामध्ये संबंधीत दस्तावेजसह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.

२. निविदा / कोटेशन मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.

३. कंत्राटी पध्दतीने पुरुष लावण्याची व्यवस्था संबधित निविदा धारकांनी करावी

४. कंत्राटी पध्दतीने पुरुष लावण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.क

५. म.प्रा.प्र वणी रंभापूर कार्यालय व विभागावरील असलेल्या संपूर्ण परिसरातील देखरेख करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने लागू केलेल्या नुकसान निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधी निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

६. कंत्राटी पध्दतीने पुरुष यांना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.

७. कंत्राटी पध्दतीने पुरुष लावतांना शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमाचे तंतोतत पालन संबधित निविदा धारकाना करावे लागेल.

८. विभागावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास कोर्ट कचेरीत न जाता त्याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी /मा. संशोधन संचालक यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक डॉ. पं.दे.कृ.वि, यांचा राहील व तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.

९. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१०. कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमाचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील

११. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी देयक सादर करते वेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करते वेळी देण्यात यावे .

१२. निविदा सुचनाची छायांकित प्रत कढून निविदा दर सादर करण्यात येऊ नये. तसे केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

१३. कंत्राटी दाराने निविदा सादर करतांना पाकिट क्र. अ मध्ये संस्थेचे नोंदणी पत्र, भविष्यनिर्वाह निधी पत्र, विमा सुरक्षा पत्र, मागील तिन वर्षाचे जी.एस.टी. भरणा केल्याचे पत्र,पॅन कार्ड व आयकर विवरण पत्र या दस्ताऐवजासह सीलबंद देण्यात यावे.

१४. कंत्राटी दाराने पाकिट क्र. ब मध्ये निविदा सुचनानुसार तक्त्या मध्ये कदलेल्या कामाच्या नुसार दर सादर करून सील बंद पाकिटात देण्यात यावे.

१५. कंत्राटी दाराने सादर केलेल्या पाकिट क्र अ मधील मागणी केलेल्या दस्ताऐवज पुर्ण असल्यास त्यास निविदा धारकाचा पाकिट क्र. ब उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१६. कंत्राटी दाराने सील बंद पाकिट अ व ब असे दोन्ही पाकीट इतर दस्ताऐवजासह सादर करावे.

१७. कंत्राटी दाराने विविध कामाकरीता लावण्यात आलेल्या कंत्राटी मजुरांची व त्यांच्या कामाची व्यवस्था ही कंत्राटी दारानेच पाहण्यात यावी काम समाधानकारक पुर्ण असल्यास देयके पारीत करण्यात येईल.

१८. निविदा प्रक्रियेतील निविदा मंजुर करण्याचे अधिकार पुर्णताह: म.प्रा.प्र. वणी रंभापुर कार्यालयाने राखुन ठेवलेले आहे व ती अट निविदा धारकास बंधनकारक राहील.

१९. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी/कंत्राट धारकांनी कामा बाबतचा तसेच कंत्राट कर्मचारांण्या किमान वेतन विमा, संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, कॅशलेश पद्धतीचा अवलंब व इत्यादी सर्व सुविधा पुरविणे या बाबतचा स्पष्ट उल्लेख कामे पुरविता वेळी देण्यात येणाऱ्या ५००/- स्टंप पेपर वर करारनामा मध्ये देण्यात यावा.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविधा धारकांनीच नमूद कामाचे निविदा सादर करण्यात याव्या

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर